**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी**

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – अजय सुदाम चौधरी

माझे वय ५० वर्षे व्यवसाय नोकरी

राहणार आंभोळ, ता.अकोले, जि.अहमदनगर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत–**

१. दिनांक १३.०९.२०१८ रोजी दुपारी ०४.०० वाजताचे सुमारास मी माझ्या मोटारसायकल क्र.एम.एच.१७–बी.पी.२७५२ वरून कोतुळ वरून आंभोळकडे जात असताना मी घराकडे वळण्याचा इंडिकेटरने इशारा दिला होता. परंतु, माझ्या पाठीमागून एक गाडी आली व त्या गाडीने माझ्या मोटारसायकलीला पाठीमागून धडक दिली. त्यामुळे, मी गाडीवरून खाली पडलो व माझ्या उजव्या खांद्याला मार लागला. माझे घरातील लोक लगेच तेथे आले व त्यांनी मला उचलले. मला त्यावेळी चक्कर आली होती. घरातील लोकांनी मला कोतुळ येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेले. तेथे उपचाराची सोय नसल्याने मला त्यांनी सिव्हील हॉस्पीटल, अहमदनगर येथे रेफर केले. मी माझ्या सोयीनुसार अकोले येथील डॉ.सदाफुले हॉस्पीटलमध्ये ॲडमीट झालो. त्यानंतर मी साईज्योत मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे ॲडमीट झालो. तेथे माझ्या हाताचे ऑपरेशन झाले. त्यानंतर मी अकोले पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली. आता मला ती फिर्याद दाखवली. त्यावरील सही माझीच आहे. ती सही मी ओळखतो. परंतु, फिर्यादीतील मजकूर मला आठवत नाही. त्या फिर्यादीवरील सहीला **निशाणी पी–१९** देण्यात आली. माझ्या मोटारसायकलीला मागून धडक दिलेली गाडी कोण चालवित होते व त्याचा नोंदणी क्रमांक काय होता, हे मला सांगता येणार नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास काही अंशी सहाय्य करीत नसल्याने सहा. सरकारी वकील यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना साक्षीदारास उलटतपासामध्ये विचारतात त्या स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मोटारसायकलीला प्लॅटीना मोटारसायकल क्र.एम.एच.१४–सी.ए.५५६८ ने धडक दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, ती मोटारसायकल आरोपी पांडुरंग सिताराम लोहकरे हा चालवित होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला देखील किरकोळ मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या अपघातामध्ये दोन्ही वाहनांचे नुकसान झाले होते.

३. आता मला फिर्यादीतील पोर्शन मार्क 'अ' मधील मजकूर वाचून दाखविला. तो मजकूर मी पोलिसांना सांगितलेला नव्हता. पोलिसांनी तसा मजकूर का नमूद केला आहे, याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्या चांगल्या परिचयाचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होऊ नये, म्हणून मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.टी.एस.फापाळे यांचेतर्फे उलटतपास–**

४. नाकारला.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.03.02 14:43:02 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**

**दिनांक – ०२.०३.२०२६**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**